# रे.दि.मु.नं. १३५/२०१६ – निशाणी ५५ खालील आदेश

शंकर गणु सरगर वि. तुकाराम गणु सरगर इ.

CNR NO. MHSO20-002677-2016

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन असे की, वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेचा दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील वादी व प्रतिवादी यांचे हिंदू एकत्र कुटूंबाच्या काही दावा मिळकती गट नं.४३९/२ व ३५१ या जमीनी व गट नंबर ३९०/२ व ३९०/३३ मधील चालू पाण्याचे विहीरीचा समावेश नजरचुकीने दाव्यात नमूद करण्याचे राहून गेलेले आहे. सदर मिळकती दाव्यात सामील न केलेस वादीचे काधीही न भरुन येणारे फार मोठे नुकसान होणार आहे. सबब, वादीने अर्जात नमूद केलेप्रमाणे दावा कलम १ मध्ये गट नंबर ३५१ व गट नंबर ४३९/२ हे मिळकत सामील करण्याची विनंती केली.

३. वादीचे पुढील कथन की, दावा जमीन गट नं.३९०/२ मधील नवीन विहीर सदर विरीरीवरुन सुमारे ९०० मीटर लांबीची गट क्र.४४०/२ पर्यंतची पी.व्ही.सी. ३ इंची पाईपलाईन, गट नं.३९०/३ मधील चालू पाण्याची विहीर सदर विहीरीतून ४५० मीटर लांबीची गट क्र.३९०/५ पर्यंतची पी.व्ही.सी. ३ इंची पाईपलाईन वरील दोन्ही विहीरी व दोन्ही विहीरीत वादींचा १/४ अविभक्त हिस्सा वरील मजकूर सामील करणेस परवानगी मिळणेची विनंती केली. तसेच दावा कलम ३ चे खाली अर्जात नमूद ३अ हा मजकूर सामील करणेची व त्याप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली.

४. सदर अर्जास प्रतिवादी तर्फे त्यांचे म्हणणे मांडले की, सदर अर्जातील संपुर्ण मजकूर खोटा व बनावट असून तो या प्रतिवादीस मुळीच मान्य व कबुल नाही. सबब, सदरील अर्ज नामंजूर करणेत यावा.

५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या कथनावरुन माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने मागितलेली दुरुस्तीची मागणी मान्य होण्यास पात्र आहे का ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबत –**

६. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेचा दाखल केलेला आहे. वादीच्या अर्जाप्रमाणे दावा मिळकतीत अर्जात नमूद मिळकती व विहीर सामाविष्ठ करण्याचे नजरचुकीने राहून गेले आहे. त्यामुळे अर्जात नमूद केलेल्या मजकूराप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मागितली आहे. सदरचे मिळकत दाव्यात समाविष्ट न केलेस दाव्यास हॉचपॉट या कायदेशीर तत्वाची बाधा येणार आहे. सबब वादीने अर्जात नमूद मिळकत समाविष्ट करण्यास व त्याप्रमाणे दुरुस्तीस परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

७. सदरची दुरुस्ती होणे कायद्याच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे त्याला अनुषंगून वादीने मागितलेली मागणी मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेकरीता वादीने मागणी केलेली दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ही सर्व परिस्थीती पहाता अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यातील गुंता टाळण्यासाठी सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा सन २०१६ साली दाखल केलेला असून सदरचा दुरुस्तीचा अर्ज दि.१३/०३/२०२४ रोजी दाखल केला आहे. दावा दाखल केल्यापासून सुमारे आठ वर्षाच्या कालावधीनंतर दुरुस्तीचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर विलंबाचा खर्च वादीवर ठेवणे योग्य होणार आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो –

## आदेश

१. वादीचा अर्ज (नि.५५) वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रु.१,०००/– (एक हजार रुपये) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. सदर आदेशाच्या दिनांकापासून वादीने अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती करुन, दुरुस्ती प्रत १४ दिवसांचे आत हजर करावी.

सांगोला. (सौ. बी. एम. पोतदार)
दिनांक: १४/०६/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 15/06/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 18/06/2024 |